# महानुभावांचे ओवीवाङ्मय

'महानुभावांचे ओवीवाङ्मय' या संशोधनप्रकल्पासाठी मी आजवर महानुभावांच्या अनेक मठमंदिरांना व हस्तलिखित संग्रहालयांना भेटी दिल्या. त्यातून अनेक बाडांचा मला अभ्यास करता आला. 'लीळाचरित्र' या मराठीतील पहिल्या गद्यग्रंथात लिखित स्वरूपातील पहिली ओवी पाहायला मिळते. त्यानंतर महानुभावांनी प्रचंड अशा स्वरूपात ओवीवाङ्मयाची निर्मिती केली आहे. 'ओवीप्रबंध' तर आहेतच. परंतु स्फुट स्वरूपातील ओवीवाङ्मयही खूप महत्त्वाचे आहे, असे माझ्या लक्षात आले. 'शांताबाईसाच्या ओव्या', 'तिघींचा श्रीगुण संवाद', 'भरवस ओव्या', 'लीळाचरित्राच्या ओव्या', 'रिद्धपूर ओव्या', 'द्रौपदी वस्त्रहरण ओव्या', 'श्रीकृष्णलीला ओव्या', 'भानखेडी विजन ओव्या', 'कमळाइसाचा धावा', 'फलटणमाहात्म्य ओव्या' यांसारख्या अनेक ओव्या मला उपलब्ध झालेल्या आहेत.

विविध जाती-धर्माचे लोक महानुभाव संप्रदायात असल्याने या ओवीगीतांमधून त्या त्या जातीव्यवस्थेचे अनेक संदर्भ उपलब्ध होतात. मुख्य म्हणजे सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन, लोकपरंपरा, लोकाचार, कुळधर्म, विधीपरंपरा इत्यादींचे यादवकालीन संदर्भ या ओवीगीतांतून उपलब्ध होतात. महानुभावांचे तेरा आम्नाय असून, त्या तेरा आम्नायांचा इतिहास, त्यांची गुरूपरंपरा, त्यांची वाङ्मयनिर्मिती यासंबंधीचे ऐतिहासिक संदर्भ यांतून मिळतात. मराठी संस्कृती, व इतिहास यांवर या ओवीगीतांतून प्रकाश पडू शकतो, असे लक्षात आले. महानुभावांनी प्रचंड प्रमाणात साहित्यनिर्मिती केलेली असली तरी त्याचा अभ्यासपूर्ण इतिहास अजून लिहिला गेलेला नाही. ओवी वाङ्मयाच्या आधारे महानुभावांची कुलपरंपरा आणि त्यांच्या साहित्यनिर्मितीचे अनेक संदर्भ उपलब्ध होत असल्यामुळे महानुभावांच्या साहित्याचा इतिहास लिहिण्यासाठी हे ओवीवाङ्मय निश्चितच साह्यभूत ठरेल असे लक्षात आले. महानुभावांची ही ओवी प्रामुख्याने तीन चरणी, साडेतीन चरणी अशा स्वरूपाची आहे. तेराव्या शतकापासून तो अठराव्या शतकापर्यंत ही ओवीनिर्मिती अखंड स्वरूपात पाहायला मिळते. तिच्या आधारे मध्ययुगीन सामाजिक इतिहासावर प्रकाश पडतो. या ओवींचा मध्ययुगीन इतर सांप्रदायिक ओवींशी तौलनिक विचार करता येऊ शकेल. त्यातूनही महानुभाव ओवीवाङ्मयाचे वेगळेपण सिद्ध करता येईल. अप्रकाशित ओवी वाङ्मय अजूनही उपलब्ध होत आहे. उपलब्ध ओव्यांचा 'मराठीची ओवी परंपरा', 'महानुभावांची ओवीपरंपरा', 'महानुभावांच्या ओवी वाङ्मयाचे सांस्कृतिक व सामाजिक अध्ययन', 'ओवी वाङ्मयातील महानुभाव तत्त्वज्ञान' आणि 'ओवीची वाङ्मयीन वैशिष्ट्ये' इत्यादी घटकांच्या आधारे त्याचा अभ्यास सुरू आहे.

- डॉ. अविनाश आवलगावकर,
प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख